जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये नैमित्तीक रिकाम्या जागांची माहिती राज्य निवडणूक आयोगास तात्काळ कळविण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०१५/प्र.क्र.१२/का.७,
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २३/०२/२०१५

परिपत्रक

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्यांच्या मुदती संपण्यापूर्वी घेण्याची तसेच या संस्थांमधील नैमित्तीक रिकाम्या जागा शक्य तितक्या लवकरात लवकर निवडणूक घेऊन भरण्याची संविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे. त्यासाठी रिक्त पदांची माहिती राज्य निवडणूक आयोगास तात्काळ कळविली जाणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम ४१ मध्ये जिल्हा परिषदेमधील एखादी जागा रिकामी झाली असेल तर, त्याप्रसंगी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ही घटना राज्य निवडणूक आयोगास ताबडतोब कळविल अशी स्पष्ट तरतूद आहे. तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ६३ मध्ये पंचायत समितीमधील एखादी जागा रिकामी झाली असेल तर, त्याप्रसंगी, गटविकास अधिका-याने ही घटना राज्य निवडणूक आयोगास ताबडतोब कळविली पाहिजे अशी स्पष्ट तरतूद आहे. तथापि, असे आढळून आले आहे की, संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी / गटविकास अधिकारी अधिनियमातील उपरोक्त तरतुदींचे पालन करीत नाहीत. परिणामी राज्य निवडणूक आयोगावर असलेली संविधानिक जबाबदारी पार पाडण्यात विलंब होतो.

वरील परिस्थितीत या परिपत्रकाद्वारे उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तसेच गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी रिक्त पदांची माहिती

कळविण्यासंदर्भातील अधिनियमातील तरतुदींचे तंतोतंत पालन करणे आवश्यक राहील. तसेच रिक्त पदांची माहिती आयोगास कळविण्यास त्यांच्याकडून विलंब झाल्यास त्यांच्याविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतुदीनुसार विभागीय चौकशीची कार्यवाही करण्यात येईल.

सदर परिपत्रक राज्य निवडणूक आयोगाच्या www.mahasec.com या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( नि. ज. वागळे )
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग

प्रति :-

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
२. गटविकास अधिकारी, सर्व पंचायत समित्या
३. निवड नस्ती